# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.१९९५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

जा.क्र.: विससं/उशि/कॉविप/शिष्यवृत्ती/२०२२/1670 दि.२२.०७.२०२४

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम बिना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

**विषय: उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ:१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिमाप-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि. ०८.०७.२०२४
२. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/व्या.अ.प्र.मु./२०२४,दि.१२.७.२०२४
३. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. विससं/उशि/कॉविप/शिष्यवृत्ती/२०२२/१५८१, दि.16.07.2024
४. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमोशि/३८५२, दि.१९.७.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ०७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भाधित शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process CAP) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्थात नूतनीकरण करणाऱ्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने उच्च शिक्षण घेणा-या मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करणेकरीता महाविदयालयांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१. मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती महाविदयालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करावी.

२. महाविदयालयातील प्रवेश प्रक्रियेच्या प्रमुखाने प्रवेशावेळी सर्व पात्र मुलींना सदरहू योजनेची सविस्तर माहिती तसेच शिष्यवृत्तीची पुर्वतयारी करणेकरीता आवश्यक कागदपत्रांची माहिती दयावी.

३. सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता महाविदयालयामधील जाणकार अध्यापकांची स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) म्हणून नेमणूक करण्यात यावी.

४. महाविदयालयाच्या स्तरावर विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांबाबत माहिती होणेकरीता तसेच विदयार्थ्यांना येणा-या अडचणींचे निराकरण करणेकरीता स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष निर्माण करण्यात यावा.

५. मुलींना मोफत शिक्षण या योजनेबाबतची सविस्तर माहितीचा फलक महाविदयालयाच्या दर्शनी भागात लावावा. सदरहू फलक हा महाविदयालयाच्या प्रवेशद्वाराजवळ तसेच विदयार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात ठळकपणे येईल अशा स्वरुपात लावण्यात यावा.

६. शिष्यवृत्ती योजनांचे आवेदन पत्रे सादर करणेबाबत प्रात्यक्षिक प्रशिक्षण (Hands on Training) महाविदयालयाच्या स्तरावर आयोजित करावे.

७. विदयार्थ्यांना येणा-या अडचणींचे निराकरण करणेकरीता महाविदयालयातील स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांचा संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावावा.

वर नमूद केल्याप्रमाणे मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत दिलेलया निर्देशानुसार महाविदयालय, संस्था, विदयापीठ मधील स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांची नांव, पदनाम व संपर्क क्रमांक याबाबतची माहिती या कार्यालयास पत्राद्वारे समक्ष आणि ईमेलद्वारे jtdire.१११५@gmail.com या ईमेल आयडीवर तात्काळ सादर करावी. तसेच मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी केलेलया कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा. तसेच कोणतीही पात्र विदयार्थीनी या योजनेपासून वंचित राहणार नाही, याची सर्व प्राचार्य, महाविदयाल, संस्था प्रमुख, विदयापीठ यांनी याबाबतची नोंद घ्यावी.

(डॉ.विजय नारखेडे)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत

मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.